नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ११/०५/२०२६ (सोमवार )

---

# पोलीस स्टेशन वेलतुर अप क्रं १०२/२०२६ मध्ये आणखी २ आरोपी अटक

पोलीस स्टेशन वेलतुर :— दिनांक ०५/०५/२०२६ रोजी कुही तहसिल कार्यालयात कार्यरत नायब तहसिलदार श्री. बुध्दभुषण अर्जुनराव निकाळजे, वय ३७ वर्षे, यांचेवर मौजा बोरी नाईक शिवारात अवैध माती उत्खनन करणाऱ्यांनी **जिवघेणा हल्ला केला होता.** सदर प्रकरणी दिनांक ०६/०५/२०२६ रोजी पोलीस स्टेशन वेलतुर येथे अपराध क्रमांक १०२/२०२६ कलम ३०३ (२), ६२, १३२, २२१, १२१(१), १०९ भान्यासं सह कलम ४८(७),४८(८), महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, ४,२१ खान आणि खनिजे अधि. १९५७ , सह कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच **आरोपी नामे अय्युर भगवान थोटे, वय २४ वर्ष, रा. दहेगाव ता. मौदा, जि. नागपुर. ह.मु. राजोला, ता कुही, जि नागपुर याला तात्काळ अटक करण्यात आली होती.**

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा दिनांक आणि श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड यांचे मार्गदर्शनात वेलतुर पोलीसांनी सदर गुन्हयाच्या तपासात टॅक्टर क्र एम एच ४० सी एक्स ६९१८, टॅक्टर एम एच ४० सिक्यू ०५४४ आणि जेसीबी क्रं एम एच ४० सी क्यू २३८८ चे चालकांनी संगणमत करून अवैधरित्या मातीचे उत्खनन केले असुन त्यांचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न केले. वेलतुर पोलीसांनी टॅक्टर क्र एम एच ४० सी एक्स ६९१८ चा

चालक आरोपी नामे **विनोद मनोहर निरगुळकर, वय ३० वर्षे, बोरीनाईक पुर्नवसन** आणि ट्रॅक्टर एम एच ४० सिक्यू ०५४४ चा चालक आरोपी **धनपाल पंढरी तुळसकर, वय ३३ वर्षे, बोरीनाईक पुर्नवसन** या दोन आरोपींना दिनांक ११/०५/२०२६ रोजी अटक केली आहे. **दोन्ही ट्रॅक्टर ट्रॉली जप्त करण्यात आले आहे.** पोलीस सदर गुन्हयात साखळी पुरावे जोडुन तपास करीत आहेत.

## लोकअदालत मध्ये नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन मधील १०३० प्रकरणे निकाली, एकुण ९ लाख ७६ हजार ८०० रूपयांचा दंड वसुल

**नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत दिनांक ०९/०५/२०२६ रोजी आयोजीत महालोकअदालत यशस्वी रित्या पार पडली. नमुद लोकअदालत मध्ये खालील प्रमाणे प्रकरणे निकाली काढण्यात आली.**

**नागपुर उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मधील** १२२ प्रकरणे निकाली काढून एकूण ७७,७००/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. **काटोल उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मधील** १८९ प्रकरणे निकाली काढून एकूण ३७,८००/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. **उमरेड उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मधील** एकुण १९१ प्रकरणे निकाली काढून एकूण ३,४०,८००/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. **रामटेक उपविभागातील** सर्व पोलीस स्टेशन मधील एकूण १८९ प्रकरणे निकाली काढून एकूण १०५५००/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. **कन्हान उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन** मधील एकूण ८२ प्रकरणे निकाली काढून एकूण १,४०,३००/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.**सावनेर उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मधील** एकूण २५७ प्रकरणे निकाली काढून एकूण २,७५,६००/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**वरप्रमाणे कलम २८५ भा.न्या.सं अन्वये (सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा किंवा धोकादायक रित्या वाहन उभे करणे), मदयपान करून वाहन चालविणे ड्रंक ॲड ड्राईव्ह च्या कलम १८५, महाराष्ट्र जुगार अधिनियम, महाराष्ट्र पोलीस कायदा, तसेच इतर**

**प्रकरणे असे एकुण १०३० प्रकरणे निकाली काढण्यात आली आहे.तसेच ९,७६,८००/— रूपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०८ आरोपीतांविरूध्द ,एन.डी.पी.एस कायदयान्वये ०८ गुन्हे नोंद

दिनांक १०/०५/२०२६ **रोजी** नागपूर ग्रामीण जिल्हयांतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी १) दामु आनंदराव उमक, वय ५१ वर्ष, रा. वरंभा ता. कामठी, जि. नागपूर २) अब्दुल शाहीद अब्दुल शरीफ, वय ३५ वर्षे, रा. अब्दला खान यांचे घरी भाड्याने, मक्का मजीद रोड, आझाद नगर, नविन वस्ती टेका, डॉ.आंबेडकर मार्ग, नागपुर जि.नागपुर हे मौजा वाकी येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. तसेच **पोस्टे कळमेश्वर अंतर्गत** बस स्टॉप कळमेश्वर दर्गा जवळ आरोपी चंद्रमुनी राजाराम गौरखेडे, वय ५० वर्ष, राह सीलौरी वार्ड क्र.०२, पोस्टे अदासा, ता. सावनेर, जि. नागपूर **हा** सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोस्टे एमआयडीसी बोरी अंतर्गत** भारकस मोरारजी कंपनीकडे जाणारा रोड हिंगणा येथे आरोपी हर्ष दिनेश बिहारी, वय २२ वर्ष, रा. जुनी ग्रामपंचायत टाकळघाट हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. तसेच आरोपी साहील भारकर नंदेश्वर, वय २२ वर्ष, रा. कोकनागड, जि.भंडारा, ह.मु जुनी ग्रामपंचायत टाकळघाट, ता. हिंगणा, जि. नागपुर हा इंडोरामा गेट क्र. ६ समोर सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत मौजा खैरगाव येथे आरोपी नामदेव लक्ष्मण चाफेकर, वय ६० वर्ष, रा. वार्ड क्र.०२, खैरगाव, ता. नरखेड हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **तसेच** मौजा पिपळा केवळराम शिवार येथे आरोपी राजू उर्फ मधुकर बकाराम धुर्वे, वय ५५ वर्ष, रा. पिपळा केवळराम, ता. नरखेड हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोस्टे उमरेड अंतर्गत** एम.आय.डी.सी उमरेड येथे आरोपी चंदन रमाकांत

प्रसाद, वय ४० वर्ष, रा. धुरीया, जि. कुशीनगर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमुद ०८ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी. एस. कायदयान्वये ०८ गुन्हे नोंद करण्यात आले आहे

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ११ गुन्हे नोंद

दिनांक १०/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ८१५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे १) अमोल चिंतामण पुडके, वय २८ वर्ष, रा. कोच्छी, ता. सावनेर, जि.नागपुर तसेच २) विनायक श्रीराम नेवारे, वय ६० वर्ष, रा. शिवाजीनगर घरकुल कॉलोनी खापा यांचे वर प्रत्येकी १ असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे आरोपी नामे खुशाल संतोष हजारे, वय ३४ वर्षे, रा. पाचगाव, त. उमरेड, जि. नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी ज्ञानेश्वर सोमाजी मसराम, वय ५६ वर्ष, रा. प्लाट नंबर १९२, वैष्णवी माता नगर, पिपला रोड बेसा नागपुर ह. मु. खापरी डव्हा, तह. उमरेड, जि. नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे राजेन्द्र मारोतीरावजी काळमेघ, वय ५५ वर्ष, रा. पिंपळगाव वखाजी, ता. नरखेड याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे १) अतुल शामराव झुरे, वय ३५ वर्ष, रा. सालई, ह.मु. खुमारी, ता. रामटेक जि. नागपूर शहर २) महिला आरोपी यांचे वर प्रत्येकी १ असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे आरोपी नामे सुरेंद्र ताराचंद हातझाडे, वय ३२ वर्ष, रा. आंजनगिरी, त. तिरोडी, जि. बालाघाट (म.प्र) याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे १) दिपक राजु कुमरे, वय २७ वर्षे, रा. रमजान घोटी, पोस्टे देवलापार, ता. रामटेक, जि. नागपुर २) कमलेश लक्ष्मन इनवाते, वय ३१ वर्षे, रा. बंजार पथरई, ता. रामटेक, जि. नागपुर यांचे वर प्रत्येकी १ असे ०२ गुन्हे नोंद आहे.

नमुद कारवाईत एकुण १) ८० लिटर मोहाफुल गावठी दारू २) २,३४० मिली देशी दारू असा एकुण ८,१५०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने